जनतेचा
# सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

Posted AT- koparkhairane Navi mumbai, Weekly Thursday

मुख्य संपादक : राजेंद्र बोडके : ९३२२५९२८१४

◆वर्ष : ४ ◆अंक : ३३ ◆नवी मुंबई / ठाणे / महाराष्ट्र ◆मंगळवार दि. ३० जुलै २०२४ ते ५ ऑगस्ट २०२४ ◆मराठी साप्ताहिक ◆पाने : ४ ◆किंमत : २ /- ◆RNI- MAHMAR/2020/79438

जनतेचा सावधान महाराष्ट्र या वृत्तपत्रासाठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका, शहर व ग्रामीण विभागासाठी पत्रकार व जाहिरातदार नेमणे आहे, अनुभवी व इच्छुकांनी खालील नंबरवर संपर्क साधावा.

## सिडको महागृहनिर्माणातील लाभार्थ्यांना हजारो रुपयांचा मालमत्ता कराचा भुर्दंड

**पनवेल :** सिडको महामंडळ आणि पनवेल महापालिका यांच्यातील असमन्वयाचा फटका सिडकोने बांधलेल्या महागृहनिर्माण योजनेतील सामान्य लाभार्थ्यांना सहन करावा लागत आहे. या लाभार्थ्यांना इमारतीच्या भोगवटा प्रमाणपत्र दिल्याच्या तारखेपासून मालमत्ता कर आकारणी पालिकेने केली आहे. मात्र शेकडो लाभार्थ्यांनी सहा महिने व एक वर्षानंतर ताबा मिळाल्याने लाभार्थ्यांच्या खिशावर हजारो रुपयांचा भुर्दंड पडला आहे.

सिडको मंडळाने महागृहनिर्माण योजनेतील सदनिकांची सोडती काढून त्यानुसार लाभार्थ्यांची निवड केली. तसेच ज्या लाभार्थ्यांनी लवकर सदनिकेची रक्कम भरली त्यांना लवकर सदनिकेचा ताबा तर काहींना उशिराने सदनिकेचा ताबा दिला जातो. परंतू सदनिका धारकांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून मालमत्ता कर आकारणी पनवेल महानगरपालिकेकडून केली जात असल्यामुळे हजारो रुपयांचा भुर्दंड विनाकारण सदनिका मालकांना सोसावा लागत आहे.

सिडकोने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत ९५,००० परवडणारी घरे बांधण्याचा महत्वकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. यातील काही प्रकल्प हे नवी मुंबई तर काही प्रकल्प हे खारघर, तळोजा आणि कळंबोली या पनवेल महानगरपालिका क्षेत्रात उभारण्याचे काम हाती घेतले. यापैकी हजारो सदनिकांचे बांधकाम सिडकोने पूर्ण केले. परंतू सदनिकेचा ताबा मिळण्यासाठी सिडकोकडून दिरंगाई झाल्याने नागरिकांना सिडको विरोधात मोर्चा काढण्याची वेळ आली. सध्या सिडकोचे हे लाभार्थी मालमत्ता करवसूलीच्या ओझ्याखाली अडकले आहेत.

महागृहनिर्माण योजनेतील खारघर येथील बागेश्री गृहसंकुलातील सदनिका धारकांना मे २०२४ मध्ये मालमत्ता कराचे देयके प्राप्त झाली. मात्र या गृहसंकुलातील सदनिकाधारकांना २८ जून २०२१ पासून सरसकट मालमत्ता कर आकारणी पनवेल पालिकेकडून करण्यात आली. यातील अनेक सदनिका धारकांना त्यांच्या घराचा ताबा सहा महिने तर काहींना वर्षभरानंतर मिळाला.

त्यामुळे भोगवटा प्रमाणपत्रा नंतरचा आणि ताबा प्राप्त होण्याअगोदरच्या महिन्यांचा आणि वर्षांचा हजारो रुपयांचा मालमत्ता कर पनवेल महापालिकेने सदनिकाधारकांकडून वसूल करण्यासाठी त्यांच्या करदेयकात लावला आहे. तसेच संबंधित मालमत्ता कर न भरल्यास त्यावर दंड लावला जाणार आहे. त्यामुळे सिडकोच्या लाभार्थ्यांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार बसत असल्याची भावना सदनिकाधारकांची बनली आहे. महानगरपालिकेने करदेयकात ताबा मिळालेल्या तारखेनंतरचा कर आकारावा, करावर लावलेली शास्ती रद्द करावी आणि इमारत घसाराबाबतचा नियम लावून मालमत्ता कर आकारणी कमी करावी अशी मागणी रहिवाशांकडून होत आहे.

**“ याबाबत पनवेल महापालिकेकडे काही निवेदने प्राप्त झालेली आहेत. सिडको मंडळाकडे आम्ही पत्रव्यवहार करून तो विषय मार्गी लावण्याबाबत सातत्याने प्रयत्नशील आहोत. शास्ती रद्द करणे तसेच घसारा लावून सूट देण्याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. - बाबासाहेब राजळे, उपायुक्त (कर), पनवेल महानगरपालिका**

विकासक या नात्याने ही घरे ताबा देण्यापूर्वी सिडकोकडे होती. त्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून ते ताबा देण्याच्या काल ावधीतील मालमत्ता कर सिडकोने भरला पाहिजे. तसेच आम्हाला मालमत्ता कराची बिले ह्या वर्षी पहिल्यांदा देण्यात आलेली असल्याने शास्तीची रक्कम रद्द केली पाहिजे. आणि घसाराबाबत नियम लावून त्याचा लाभ आम्हाला महापालिकेने दिला पाहिजे. – **संजय भोगले, लाभार्थी, बागेश्री गृहसंकुल, खारघर**



## भव्य जनआक्रोश मूक मोर्चा, पीडित महिलेचा खटला जलदगती न्यायालयात वर्ग करा...

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील एका विवाहित महिलेवर शीळफाटा नजीक एका मंदिर परिसरात सामूहिक बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी तीन जणांना अटक केली आहे. मात्र तिच्यावर अत्याचार करणाऱ्यांना कठोरात कठोर शासन करावे आणि सदर खटला जलदगती न्यायालयात वर्ग करावा अशी मागणी करून कोपरखैरणे ते वाशी छ. शिवाजी महाराज चौक असा सुमारे चार किलोमीटर जनआक्रोश मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रात अनेक व्यक्ती तसेच स्थानिक ग्रामस्थ हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

नवी मुंबईत राहणारी महिला कौटुंबिक अत्याचाराला कंटाळून घरातून निघून गेली ते थेट शीळ फाटा येथील एका मंदिरात. ती एकटी पाहून मंदिरातील बदली व्यक्तीने अन्य दोन साथीदारांच्या मदतीने तिला चहातून गुंगीचे औषध पाजले. तिला ग्लानी आल्यावर तिच्यावर सामूहिक बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. तिचा मृतदेह आढळून येताच वेगाने तपासाची चक्र फिरले आणि तीन आरोपींना अटक करण्यात आली.

सदर खटला जलदगती न्यायालयात चालवावा आणि अत्याचार करणाऱ्यांना कठोरात कठोर शासन द्यावे अशी मागणी करीत जनआक्रोश मूक मोर्चा काढण्यात आला होता. कोपरखैरणे तीन टाकीपासून सकाळी साडेआकाराच्या सुमारास निघालेला जनआक्रोश मोर्चा १ च्या सुमारास छ. शिवाजी महाराज चौक वाशी येथे पोहचला. या चार किलोमीटर अंतरात अनेक जण मोर्चात सामील होत होते. शेवटी त्याचे विराट मोर्चात रूपांतर झाले होते. या मोर्चात २९ गावातील ग्रामस्थ तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## मुंबईकरांची सुरक्षा धोक्यात

**पनवेल :** पनवेल येथून मुंबईच्या कोणत्याही ठिकाणी जाण्यासाठी लोकलसेवा सुरू आहे. या लोकलने लाखो प्रवासी रोज मुंबईत ये–जा करतात. मुंबईच्या लोकलमध्ये काही वर्षांपूर्वी झालेल्या स्फोटांच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची तपासणी होणे गरजेचे आहे. मात्र तसे होताना दिसून येत नाही. प्रत्येक स्थानकात सुरुवातीला स्कॅनिंग मशीनही ठेवले होते; मात्र तेही पनवेल स्थानकात नसल्याने प्रवासी त्यांच्याबरोबर काय घेऊन जात आहेत, हे तपासले जात नाही. येथील पोलीस यंत्रणा रात्री स्थानकात थांबणाऱ्या प्रवाशांवरच दमदाटी करताना दिसून येते. मुंबईकरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने येथील सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करणे गरजेचे आहे.

### लोकशाहीचा डीएनए पत्रकार: वसंत मुंडे

## विदर्भात सर्व स्तरातील लोकांचा संवाद यात्रेला प्रतिसाद आणि पाठिंबा



**अकोला, प्रतिनिधी :** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाची घटना लिहिली. घटनेतच त्यांनी पत्रकार आणि माध्यमे लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्याचे ठणकावून सांगितले. कारण महामानव बाबासाहेब हे घटना लिहिण्यापूर्वी पत्रकार होते. त्यांनी बहिष्कृत भारत नावाचे वर्तमानपत्र काढले. यामुळे पत्रकार हे खऱ्या अर्थाने लोकशाहीचा डीएनए आहेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केले. ते अकोला येथे मंगळवारी (दी.३०) पत्रकार परिषदेत बोलत होते.

दीक्षा भूमीवरून निघालेली पत्रकार संवाद रॅली सेवाग्राम (वर्धा), अमरावती मार्गे मंगळवारी (दी.३०) दुपारी १२ वाजता अकोला येथे पोहोचली. येथील विश्रामगृहावर प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांची पत्रकार परिषद झाली. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या पत्रकारांना संबोधित करताना वसंत मुंडे म्हणाले, कोरोना महामारीनंतर पत्रकारांची अवस्था ना घर का ना घाट का... अशी झाली आहे. (पेज २ वर)

**“ विविध स्तरातून पाठिंब्याचे पत्र**

दीक्षाभूमी येथून निघालेली पत्रकार संवाद रॅली विदर्भातील विविध जिल्ह्यातून जात आहे. यावेळी पत्रकार रोज आमचे प्रश्न मांडतात. मग ते आज अडचणीत असतील तर आम्हीही त्यांच्या सोबत आहोत, असे म्हणत विविध सामाजिक संघटना, प्रतिष्ठाने संवाद रॅलीला पाठिंब्याचे पत्र देत आहेत. अकोला येथे अंकुर साहित्य संघाच्या वतीने अध्यक्ष हेमंत ढाळे व विष्णू रामचंद्र जोध यांनी जाहीर पाठिंबा दिला. तसेच पुरोगामी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अब्दुल साबीर, बिस्मिल्ला शाह तसेच अकोला येथील शेतकरी संघटनेने जाहीर पाठिंबा दिला. यावेळी शेतकरी संघटनेचे साहेबराव लांडे, गजानन पालखडे, सुनील खवले उपस्थित होते.

## बेलापूर येथील शहाबाज गाव इमारत दुर्घटनेत ३ मृत्यूमुखी

२७ जुलै २०२४ रोजी बेलापूर सेक्टर १९ येथील शहाबाज गावामधील इंदिरा निवास ही ४ मजली इमारत कोसळल्याची माहिती सकाळी ४.४५ वाजता नवी मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाला प्राप्त झाली आणि



लगेचच सकाळी ५.०० वाजता नवी मुंबई महानगरपालिकेचे अग्निशमन दल (पेज २ वर)

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने या दुर्घटनेत तत्पर मदतकार्य करण्यात आले. तथापि महानगरपालिकेने जाहीर केलेल्या धोकादायक इमारतींमधील रहिवास नागरिकांनी त्वरित थांबवावा अन्यथा तेथील वीज व पाणीपुरवठा खंडित करण्यात येईल असे नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

शहाबाज गाव इमारत दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्त यांच्याशी चर्चा करून माहिती घेतली. इमारत दुर्घटनेत सापडलेल्या आपत्तीग्रस्तांना तातडीने आवश्यक ती सर्व मदत उपलब्ध करून देण्यात यावी, अशी सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी महापालिका आयुक्तांना दिल्या होत्या.

## मेट्रो कामांसाठी खोदलेल्या खड्ड्यांत साचलेले पाणी, साथीच्या आजारांचा धोका

**ठाणे :** वडाळा – घाटकोपर–कासारवडवली या मेट्रो चार मार्गिकेच्या कामांमुळे ठिकठिकाणी खोदकामे झाले असून या खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साचत आहे. महापालिकेकडून पाणी साचू नये असे आवाहन नागरिकांना केले जाते. परंतु शासकीय प्रकल्पांच्या कामांच्या ठिकाणीच पाणी साचून रोगराईला निमंत्रण मिळत असल्याचे चित्र आहे. तसेच खड्ड्यात पडून एखाद्या गंभीर अपघाताची शक्यता देखील व्यक्त केली जात आहे.

मुंबई उपनगर आणि ठाणे शहरातील रस्ते मार्गिकेवर होणारी वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) वडाळा–घाटकोपर–कासारवडवली या मार्गिकेच्या निर्माणाचे काम सुरू आहे. या कामासाठी ठाणे शहरातील पूर्व द्रुतगती महामार्ग, घोडबंदर भागात सेवा रस्ते, मुख्य रस्त्यावर ठिकठिकाणी मेट्रोचे खांब उभारणीसाठी खड्डे खणले आहेत. या खड्ड्यांभोवती पुरेसे संरक्षण पत्रे बसविण्यात येत नाही. त्यामुळे अनेकदा प्रवासी किंवा पादचारी या खड्ड्यात पडल्याच्या घटना घडल्या आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये आता पाणी साचू लागले आहे. खड्ड्यांची खोली आणि रुंदी मोठी असल्याने पाण्याचे प्रमाणही अधिक आहे. ठाणे महापालिकेकडून दरवर्षी नागरिकांना घरामध्ये पाणी साठवून ठेऊ नका असे आवाहन केले जाते. परंतु एमएमआरडीएकडूनच, खड्ड्यांमध्ये साठलेल्या पाण्याचा निचरा केला जात नाही. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, साथीचे आजार पसरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच या खड्ड्यांभोवती पुरेसे संरक्षण पत्रे देखील बसविण्यात आले नाही. त्यामुळे एखादा वाहन चालक पाण्याने भरलेल्या खड्ड्यात पडू मोठ्या अपघाताची शक्यता व्यक्त केली जात आहे. येथील पाणी तात्काळ उपसावे अशी मागणी नागरिक करत आहेत.

## नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी घेतला सर्व विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा



नवी मुंबई महानगरपालिकेने जाहीर केलेल्या धोकादायक इमारतींच्या यादी व्यतिरिक्त ज्या इमारती प्रथमदर्शनी धोकादायक दिसून येत आहेत अशा इमारतींना नोटीसा देऊन स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे सूचित करावे तसेच अनधिकृत बांधकाम विरोधात धडक मोहीम हाती घ्यावी असे निर्देश देत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी याबाबत कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही असे विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीप्रसंगी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे शहाबाज येथील दुर्घटनेतील आपद्ग्रस्त नागरिकांना आग्रोळी येथील निवारा केंद्रात ठेवण्यात आले असून त्याघठिकाणी आवश्यक सुविधा पुरविण्याची काळजी घ्यावी असेही आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेला नवी मुंबईतून अधिक प्रतिसाद मिळण्याच्या दृष्टीने व्यापक जनजागृती सुरुच ठेवावी असे निर्देश देतानाच आयुक्तांनी आजतागायत प्राप्त ४२ हजार ४६१ अर्जांच्या तपासणी कामाला वेग दयावा अशा सूचना दिल्या. जिल्हा महिला व बालविकास विभागाशी संपर्कात राहून या कामात येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करून घ्याव्यात व या आठवडयाभरात प्राप्त अर्जांची तपासणी पूर्ण करावी असे स्पष्ट निर्देश समाजविकास विभाग तसेच आठही विभाग अधिकारी यांना देण्यात आले.

नागरिकांशी निगडीत असलेल्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याची कार्यप्रणाली तत्परतेने अंमलात आणावी असे सूचित करतानाच पहिल्या टप्प्यात सुरु होणाऱ्या ३८ सेवा महानगरपालिकेच्या पोर्टलवरुन ऑगस्टमधेच सुरु व्हाव्यात असे आयुक्तांनी निर्देश दिले. पेमेंट गेटवेची सुविधाही उपलब्ध करुन देण्याबाबत गतीमान कार्यवाही करावी व त्याची नागरिकांमध्ये व्यापक प्रसिध्दी करावी असे आयुक्तांनी स्पष्ट केले. (पेज २ वर)

## वाशी विभागात अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई

नवी मुंबई महानगरपालिका फार्यक्षेत्रातील सी विभाग वाशी कार्यक्षेत्रातील सी - १ (अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्काशीत करणे) या प्रवर्गात घोषित करण्यात आलेल्या इमारतीचे मा. आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांचे आदेशान्वये व उपायुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनानुसार सी विभाग कार्यालयाचे सहायक आयुक्त सागर मोरे यांच्या नियंत्रणाखाली पुढील नमूद केलेल्या इमारतींवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

१. बी - ३ टाईप अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन (बिल्डिंग नं. १ ते १०), से.२ वाशी (पाणी पुरवठा दि. २०/०६/२०२४ रोजी खंडीत केला होता. विद्युत पुरवठा व मल निःसारण वाहिनी खंडीत करण्यात आला आहे.)

२. मे. नुर को ऑप हो सो लि, प्लॉट नं–१८, सेक्टर–०९ ए, वाशी, नवी मुंबई. (पाणी पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.)

३. मे. ऊर्जा को ऑप हो सो लि, प्लॉट नं –६, सेक्टर–१० ए, वाशी, नवी मुंबई. (पाणी



पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.)

या धडक मोहिमेसाठी पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी/कर्मचारी, अतिक्रमण विभागाचे अधिकारी/कर्मचारी व स्थानिक पोलिस स्टेशनचे कर्मचारी उपस्थित होते. या धडक मोहिमेसाठी एकूण १० मजुरांचा वापर करण्यात आला. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.



**नेरुळ , तुर्भे, बेलापूर नवी मुंबई नोड साठी सहाय्यक आयुक्त मयूर भुजबळ यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांना शुभेच्छा देताना जनतेचा सावधान महाराष्ट्र मुख्य संपादक व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ कोकण विभागीय कार्याध्यक्ष राजेंद्र बोडके यांनी दिल्या शुभेच्छा व जनतेचा सावधान महाराष्ट्र वृत्तपत्राला माहिती देताना भुजबळ यांनी सांगितले की कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सदैव प्रयत्न राहतील व नागरिकांचीही नैतिक जबाबदारी आहे की आपल्या आजूबाजूला काही घटना घडत असतील तर आपण पोलिसांना कळवले पाहिजे पोलीस हे नागरिकांच्या सेवेसाठी असतात त्यामुळे नागरिकांनीही आपली जबाबदारी पोलिसांना सहकार्य करून पार पाडावी**

जनतेचा सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

# संपादकीय

## निकालाच्या मर्यादा !

**मुळात खनिजांवरील स्वामित्वधनाचा वादच 'प्रसंगी दांडगाई, अरेरावी करणारे केंद्र सरकार आणि प्रसंगी बेजबाबदारपणाचे दर्शन घडवणारी राज्ये' यांच्यातला!**

खंडपीठाने ८ - १ अशा बहुमताने दिलेला निकाल सर्वार्थाने दूरगामी आहे. यातील मुद्दे केवळ आर्थिक नाहीत. केंद्र - राज्य संबंधांपासून ते कर आकारणीबाबत राज्यांची स्वायत्तता ते पर्यावरण आणि राज्या - राज्यांतील स्पर्धा अशा अनेक मुद्द्यांवर या निर्णयाचा परिणाम होणार असून हा निर्णय जर पूर्वलक्ष्यी प्रभावाने अमलात आला तर आर्थिक आणि राजकीय आघाडीवर हलकल्लोळ माजेल यात शंका नाही. या विषयाची व्याप्ती लक्षात घेता जे झाले ते राज्यघटनेची कलमे आदी तांत्रिक मुद्दे दूर ठेवून समजून घेणे आवश्यक ठरते.

सुमारे पाव शतकभर न्यायप्रविष्ट असलेले हे प्रकरण म्हणजे मिनरल एरिया डेव्हलपमेंट ऑथॉरिटी विरुद्ध स्टील ऑथॉरिटी ऑफ इंडिया यांच्यातील खटला. त्यात पुढे झारखंड, प. बंगाल, ओडिशा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक ही राज्ये आणि प्रत्यक्ष केंद्र सरकार उतरले. यावरून हे प्रकरण सर्वपक्षीय आहे हे लक्षात येईल. ही सर्व राज्ये खनिजसंपन्न आहेत आणि त्या त्या राज्यांकडून स्वामित्वधन स्वामित्व मूल्य (रॉयल्टी) आकारून त्या त्या राज्यांतील खाणींतून खनिजे काढण्याची कंत्राटे सरकारी वा खासगी कंपन्यांना दिली जातात. यापैकी काही राज्यांनी या स्वामित्व मूल्याखेरीज खनिकर्म उद्योगातील कंपन्यांवर कर आकारला. त्यास न्यायालयात आव्हान दिले गेले आणि दोन स्वतंत्र टप्प्यांवर सात आणि पाच सदस्यांच्या खंडपीठाने दोन स्वतंत्र निकाल दिले. यातील एका निकालात स्वामित्वधन म्हणजेच कर असा निर्वाळा होताय तर दुसऱ्या पीठाने कर आणि स्वामित्वधन हे दोन भिन्न मुद्दे असल्याचे सांगितले. म्हणून अंतिम निवाड्यासाठी सर्वोच्च न्यायालयात यापेक्षा अधिक म्हणजे नऊ न्यायाधीशांच्या पीठासमोर याची सुनावणी झाली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, हृषीकेश रॉय, अभय ओक, जेबी पारडीवाला, मनोज मिश्रा, उज्जल भुयान, सतीश चंद्र शर्मा आणि ऑगस्टीन जॉर्ज मसीहा तसेच न्या. बी व्ही नागरत्ना यांच्या पीठाने बहुमताने हे प्रकरण निकालात काढले. स्वामित्वधन आणि कर हे दोन भिन्न मुद्दे आहेत आणि राज्यांना स्वामित्वधनाखेरीज स्वतंत्र कर आकारणी करण्याचा अधिकार आहे यावर आठ न्यायाधीशांचे एकमत झाले आणि न्या. नागरत्ना यांनी स्वतंत्रपणे आठ मुद्द्यांद्वारे आपली मतभिन्नता नोंदवली. त्यांची मते केंद्राच्या मतांशी जुळणारी आहेत. जमीन हा विषय जरी राज्यांच्या अखत्यारीत असला तरी त्या जमिनींखालील खनिजे आणि मूलद्रव्यांवर केंद्र सरकारचा हक्क असतोय सबब राज्यांना त्यावर कर आकारण्याचा हक्क नाही हा केंद्र आणि न्या. नागरत्ना यांच्या मताचा सारांश. सर्वोच्च न्यायालयाने केंद्राचा हा मुद्दा नाकारला. स्वामित्व मूल्य आणि कर या दोन मुदलात स्वतंत्र बाबी आहेत, स्वामित्वधन म्हणजे कर नाही आणि जमीन हा मुद्दा घटनेनुसार राज्यांच्या अखत्यारीत असल्याने त्या जमिनीतून निघणाऱ्या खनिजावर राज्यांस अधिकार नाही असे म्हणता येणार नाही, असे न्या. चंद्रचूड लिखित बहुमताच्या निकालाचे मर्म. पेट्रोलजन्य घटक वगळता कोळसा, लोह, लोहखनिज, तांबे, बॉक्साइट आदी खनिजांस हा निकाल लागू होतो.

या निकालामुळे वर उल्लेखलेल्या राज्यांस आपापल्या राज्यातील खनिजावर कर आकारण्याचा हक्क मिळेल आणि ही राज्ये संपत्ती निर्मितीत अन्य राज्यांशी स्पर्धा करू शकतील. तथापि न्या. नागरत्ना आणि केंद्र सरकारचे म्हणणे असे की यामुळे या राज्यांना इतरांच्या तुलनेत असमान आघाडी मिळेल तसेच केंद्रीय अधिकारांवर गदा येऊन राज्ये वाटेल तशी मनमानी करून खाण कंपन्यांवर अन्यायकारक कर आकारणी करतील. आमची जमीन, आमचा अधिकार हे याउलट राज्यांचे म्हणणे. ते सर्वोच्च न्यायालयाने ग्राह्य धरले. राज्ये ही कोणी भांडणारी बालके आहेत आणि त्यांना नियंत्रणात ठेवणे ही पालक या नात्याने आमची जबाबदारी आहे, असा काहीसा सूर या प्रकरणी केंद्राचा दिसतो. वरवर पाहिल्यास त्यात गैर काय, असे कोणास वाटेल. पण केंद्र सरकार प्रसंगी निष्पक्ष नसते आणि राज्यांच्या अधिकारांवर गदा आणण्यास कमी करत नाही. केंद्रासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या खाण उद्योगांस राज्यांची इच्छा डावलून कसे मुक्तद्वार दिले जाते याची उदाहरणे कमी नाहीत. काही विशिष्ट उद्योगांस सर्व नियम धाब्यावर बसवून हव्या तितक्या खोदकामाचे परवाने मुक्तपणे कसे दिले जातात, हेही नवे नाही. तेव्हा केंद्राचा या प्रकरणातील युक्तिवाद प्रामाणिक मानणे अवघड. परंतु पंचाईत अशी की या प्रश्नावर राज्यांसही प्रामाणिकपणाचे प्रमाणपत्र देता येणार नाही. काही स्थानिक मूठभर खाण मालकध्उद्योजक हे स्थानिक सरकारांस कसे वाटेल तसे वाकवू शकतात याची उदाहरणेही कमी नाहीत. शेजारील गोवा राज्यातील डिचोली, मये आदी परिसरांत याच्या अनेक भयानक खुणा सहज दिसतील. राज्यांतील शासकांस मॅनेज करणे केव्हाही अधिक सोपे, हे राजकीय सत्य या प्रकरणी दुर्लक्षिण्यासारखे नाही. आणि दुसरे असे की अधिक महसुलासाठी राज्ये या खाण उद्योगास अधिकाधिक परवाने देऊन अधिकाधिक कर आकारून पर्यावरणाचा सत्यानाश करणारच नाहीत याची शाश्वती आपल्याकडे देता येणार नाही. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे राज्यांस खनिजावर कर आकारण्याचा अधिकार मिळेल आणि त्यांची स्वायत्तता जपली जाईल हे खरेच. पण या स्वायत्ततेचा गैरवापर होण्यापासून त्यांना रोखणे हे यापुढील आव्हान असेल. म्हणजे प्रसंगी दांडगाई, अरेरावी करणारे केंद्र सरकार आणि प्रसंगी बेजबाबदारपणाचे दर्शन घडवणारी राज्ये असा हा वाद. त्यात राज्यांची सरशी झाली. परंतु या वादात राज्ये वा केंद्र यातील कोणा एकाचा युक्तिवाद रास्त होता असे ठामपणे म्हणता येणे अवघड. अशा परिस्थितीत मुळात राज्यांस आहे त्यापेक्षा स्वतंत्र महसुलाची गरज का वाटते, हा प्रश्न.

त्याचे एक उत्तर वस्तू - सेवा कर(जीएसटी) यांत आहे. या केंद्र - चलित कराने राज्य सरकारांचे उत्पन्नाचे जवळपास अधिकार काढून घेतले असून त्यामुळे राज्यांच्या अर्थमंत्र्यांस नोंदी कारकुनाच्या पातळीवर आणून ठेवले आहे. मालमत्ता करादी एखाद - दोन क्षुल्लक घटक वगळता राज्य सरकार अन्य कोणत्याही मार्गाने आपले उत्पन्न वाढवू शकत नाही आणि त्यांस केंद्राकडून मिळणाऱ्या कर महसुलातील मिळणाऱ्या वाट्याकडे डोळे लावून बसावे लागते. वस्तू - सेवा कर - पूर्व काळात राज्याराज्यांत तीव्र स्पर्धा होती. विक्री कर कमीअधिक करण्याच्या अधिकाराद्वारे त्यांना आपल्या प्रगतीचा वेग वाढवता येत असे. वस्तू - सेवा कराने राज्यांचा हा अधिकार काढून घेतला. पण आपला हा वस्तू - सेवा कर प्रामाणिक आणि धड नाही. तो जन्मतःच अपंग आहे. कारण पेट्रोल - डिझेल आणि मद्या हे घटक वस्तू - सेवा कराच्या बाहेर ठेवण्यात आले असून त्यांवर कर आकारणीचे अधिकार राज्यांस आहेत.

# फिरण्यासाठी मेघालयातील परफेक्ट ऑफबीट डेस्टिनेशन्स !

**मेघालय हे भारतातील सर्वात सुंदर राज्यांपैकी एक आहे. आपल्या नैसर्गिक सौंदर्यासाठी हे राज्य चांगलंच प्रसिद्ध आहे. येथील दाट जंगले, डोंगरं पर्यटकांना आपल्याकडे आकर्षित करतात. निसर्ग प्रेमींसाठी हे राज्य फिरण्यासाठी नेहमीच पसंतीचं ठरलं आहे. तुम्ही जर नोव्हेंबरमध्ये कुठे फिरायला जाण्याचा विचार करत असाल तर आम्ही मेघालयातील काही ऑफबीट ठिकाणांची माहिती तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत.**



### उमदेन

मेघालयातील ऑफबीट स्थळांमध्ये तुम्ही री भोई जिल्ह्यातील उमदेनला भेट देण्याचा प्लॅन बनवू शकता. हे एका सुंदर ठिकाण असून हिरव्यागार झाडांनी झाकलेले उंचच डोंगरांनी झाकलेलं आहे. शिलॉंगहून हे शहर ६५ किमी अंतरावर आहे. विणकाम करणारे लोक या शहरात अधिक राहतात. त्यासाठीच हे शहर ओळखलं जातं. येथील नागरिक सिल्कच्या माध्यमातून वेगवेगळी परंपरागत कलाकृती तयार करतात. तुम्हीही येथून रेशमच्या उत्पादनांबाबत सगळी माहिती घेऊ शकता. येथील आजूबाजूच्या जंगलात तुम्ही मनसोक्त फिरुन आपला ताण–तणाव विसरु शकता. वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी इथे जवळून बघायला मिळतील. इथे तुम्ही ट्रेकिंग आणि हायकिंगचाही आनंद घेऊ शकता. ट्रेकर्स आणि कॅपर्ससाठी हे आदर्श स्थळ मानलं जातं.



### मावलेनगोट

मेघालयाची ऑफबीट सुंदरता बघण्यासाठी तुम्ही मावलेनगोटला फिरण्याचाही प्लॅन करु शकता. हे ठिकाण शिलॉंगपासून ४२ किमी अंतरावर आहे. हे एक सुंदर गाव असून हिरव्यागाग डोंगरात आणि चहाच्या बागांमध्ये वसलं आहे. येथील वातावरण फार शांत आहे, त्यामुळे इथे तुम्हाला मानसिक आणि आत्मिक शांततेचा अनुभव घेता येऊ शकतो. एक रिलॅक्स वेळ घाल वण्यासाठी हे परफेक्ट ठिकाण म्हणता येईल. येथील लोकंही फार चांगल्या स्वभावाचे असून त्यांची मदत फिरण्यासाठी होऊ शकते. तसेच येथील खास वेगळ्या पदार्थांचीही चव तुम्ही चाखू शकता.

### कांगथांन

काही लोक हे वेगळ्या अनुभवासाठी कांगथांनला जाण्याचा प्लॅन करु शकता. कांगथांग हे मेघालयातील सर्वात जास्त आकर्षक ठिकाणांपैकी एक आहे. येथील नैसर्गिक सुंदरता नेहमीट पर्यटकांना आकर्षित करते. या ठिकाणाला भारताचं व्हिसलिंग गावही म्हटलं जातं. कारण येथील लोक ऐकमेकांशी संपर्क साधण्यासाठी शिटी वाजवतात. या सुंदर गावात येथील सुंदरतेने तुम्हाला एक वेगळाच अनुभव येईल.

### मॉफलांग

शिलॉंगपासून केवळ २४ किमी अंतरावर मॉफलांग हे ठिकाण आहे. हिरवीगार डोंगरं आणि शेतीने गाव वेढलेलं आहे. हे गाव शिलॉंगहून एक विकेंड गेटनेच्या रुपातही ओळखलं जातं. निसर्ग प्रेमींना हवा असलेला नजारा इथे त्यांना बघायला मिळू शकतो. येथील मनमोहक वातावरण तुमच्या मनाला कधीही न मिळालेली शांतता देणार हे नक्की. येथील संस्कृतीही तुम्हाला इथे बघायला मिळेल.

## राशिभविष्य

३० जुलै २०२४ ते ५ ऑगस्ट २०२४

**मेष** - आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

**वृषभ** - मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

**मिथुन** - ठरविलेले पूर्ण करण्यासाठी असे प्रसंग प्रेरणादायी ठरतील. यथायोग्य विचार करून कार्य करा. निष्कारण प्रश्नांचा त्रास राहील. आरोग्याची काळजी घ्या.

**कर्क** - आजचा दिवस आपल्या कार्य–योजनेंसाठी आणि सहकाऱ्यांबरोबर आपल्या संबंधांसाठी विधायक ठरेल. अधिक चांगली कामाची स्थिती आणि सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी चांगली वेळ आहे.

**सिंह** - बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते. त्यांना ठरावीक वेळेत पूर्ण करण्याचे प्रयत्न करा.

**कन्या** - आपल्या आवश्यकतेप्रमाणे इतर लोक आपल्या मदतीला येतील. इतर योजना आणि उपक्रम नेहमीसारखेच चालू द्या. हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो.

**तूळ** - आपल्या आर्थिक मुद्द्यांनुसार एखाद्याचे मन वळविणे कठिण होईल. आपल्याकडे जे काही चांगले विचार आहेत ज्यांना इतरांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. घराच्या विषयांमध्ये वेळ उत्तम.

**वृश्चिक** - अधिकार क्षेत्रात वाढ होईल. मुलांसाठी आणि पत्नीसाठी जास्त वेळ काढणे आवश्यक आहे. सर्जनशील कार्यांमध्ये शिस्त असल्यास उन्नतीचा मार्ग मोकळा होईल. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु** - आनंदाची बातमी मिळेल. मानसन्मानात वाढ होईल. व्यापार–व्यवसायात उत्तम स्थिती राहील.

**मकर** - महत्वाची बातमी मिळाल्याने आनंदित राहाल. पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास मिळेल. अनुकूल ते सहकार्य मिळेल. वेळेचे सदुपयोग केल्याने लाभ मिळेल.

**कुंभ** - आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील. कामासाठी प्रवासाचे योग संभवतात.

**मीन** - आपणास घरात राहून साफसफाई, आवरासावर करायची असल्यास काही अनपेक्षित कारणे आपल्या कामात विघ्न आणू शकतात.

पान १ वरुन

## लोकशाहीचा डीएनए पत्रकार...

वर्तमानपत्रांचा खप प्रचंड कमी झाल्याने दैनिकांचे मालक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. आर्थिक गणित जुळत नसल्याने अनेक वर्तमानपत्रांनी विभागीय आवृत्या बंद केल्या. पत्रकारांसह कर्मचारी असलेल्या मीडिया कर्मीची संख्या कमी केली. यामुळे कोरोना महामारीनंतर हजारो पत्रकारांच्या नोकऱ्या जाऊन ते विस्थापित बनले आहेत. जे सक्रिय आहेत त्यांचे पगार कमी झाले आहेत. या साऱ्या परिस्थितीत वर्षानुवर्षापासून लोकांचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारांचे स्वतःचे प्रश्न निर्माण झाले आहेत. परंतु लोकांचा आवाज बनवून त्यांचे प्रश्न चव्हाट्यावर आणण्याचे काम करणाऱ्या पत्रकारांना दुर्दैवाने स्वतःचे प्रश्न मांडता येत नाहीत. मांडले तरी राज्यकर्ते त्याकडे दुर्लक्ष करत आहेत. कारण महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ गेल्या अनेक वर्षापासून पत्रकारांच्या प्रश्नावर शासन दरबारी आवाज उठवून पाठपुरावा करत आहे. काही प्रश्न सोडवण्यात पत्रकार संघाला यश आले असले तरी महत्वाचे प्रश्न सुटलेले नाहीत, असे मुंडे म्हणाले. पुढे बोलताना ते म्हणाले, अलीकडच्या काळात सरकार खूप उदार झालेले आहे. लाडकी बहीण पासून विद्यार्थ्यांपर्यंत समाजातील विविध घटकांसाठी काही लाख कोटींच्या योजना सरकारने जाहीर केल्या आहेत. परंतु पत्रकारांसाठी कोणतीच योजना नाही. त्याला घरकुल मिळत नाही. बँकांचे कर्ज देखील मिळत नाही. आधी स्वीकृती दिली जाते, परंतु पत्रकारांची संख्या हजार असेल तर केवळ दहा - वीस जणांना अधिस्वीकृती मिळते. कारण अधिस्वीकृती मिळवण्याचे नियम आणि अटी खूपच जाचक आहेत. खरी अधिस्वीकृतीची गरज असलेले ग्रामीण भागातील पत्रकार त्या अटी - शर्तींची पूर्तता करू शकत नाहीत. यासाठी सरकारने अटी आणि नियम शिथिल करावेत, वर्तमानपत्रांचा खप वाढवा, पत्रकार व वर्तमानपत्रांचे मालक यांना आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी नियमित वर्तमानपत्र खरेदी करणाऱ्या वाचकांना ५ हजार रुपयांची आयकरात सवलत द्यावी, गाव तेथे ग्रंथालय या योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतच्या वार्षिक आराखड्यात वर्तमानपत्र खरेदी करण्यासाठी दहा हजार रुपयांचा निधी राखीव ठेवावा. बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेचे पेंडिंग ठेवलेले प्रस्ताव तात्काळ मंजूर करावेत. जेणेकरून वयाची साठी ओलांडलेल्या ज्येष्ठ पत्रकारांचा खऱ्या अर्थाने सन्मान होईल. यासह पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने महामानव बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली दीक्षाभूमी ते मंत्रालय अशी पत्रकार संवाद रॅली काढली आहे. संवाद रॅलीला पत्रकार आणि समाजातील सर्व स्तरातल्या घटकांचा भरभरून असा पाठिंबा व प्रतिसाद मिळत असल्याचे वसंत मुंडे म्हणाले. यावेळी सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रवीण सपकाळे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांच्यासह अकोला जिल्हाध्यक्ष गणेश सुरजुसे, देवानंद गहिले, सम्राट वानखेडे, नागेश भालतिलक, रामजी श्रीवास, अजय सोळंके, जगन्नाथ कोल्हे, लक्ष्मण सपकाळ, सय्यद हसन बाबू यांच्यासह विविध माध्यमांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## क्रेडाई - एमसीएचआय द्रोणागिरी युनिटच्या अध्यक्षपदी राकेश प्रजापती

**नवी मुंबई (जनतेचा सावधान महाराष्ट्र) :** क्रेडाई - एमसीएचआय द्रोणागिरी युनिटने दीप राजपाल यांच्याकडून राकेश प्रजापती यांच्याकडे अध्यक्षपद हस्तांतरित करून, त्यांच्या पहिल्या चेंज ऑफ गार्ड इव्हेंटची यशस्वीपणे सांगता केली. ते आता युनिटचे अध्यक्ष म्हणून काम पाहतील.



द्रोणागिरी आणि उरण हे नवी मुंबई आणि मुंबईच्या विकासासाठी त्यांच्या मोक्याचे स्थान आणि वाढीच्या क्षमतेमुळे महत्त्वाचे आहेत. रायगड जिल्ह्यात वसलेले आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (JNPT) च्या शेजारी असलेले, द्रोणागिरी हे रिअल इस्टेट गुंतवणुकीचे प्रमुख क्षेत्र म्हणून उदयास येत आहे, भारतातील सर्वात मोठ्या बंदरांपैकी एक असलेल्या त्याच्या जवळचा फायदा होत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (NMIA) आणि मुंबई - ट्रान्स हार्बर लिंक (MTHL) यांसारख्या मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे द्रोणागिरी आणि उरण ही दोन्ही ठिकाणे लक्षणीय परिवर्तन अनुभवण्यास तयार आहेत. या घडामोडींमुळे कनेक्टिव्हिटी वाढेल, आर्थिक वाढ होईल आणि गुंतवणूक आकर्षित होईल अशी अपेक्षा आहे. क्रेडाई - एमसीएचआय विकासक द्रोणागिरी आणि उरणच्या संघटित विकासामध्ये सक्रियपणे सहभागी आहेत, हे सुनिश्चित करून की या भागातील रिअल इस्टेट बाजार सुसंरचित आणि टिकाऊ आहे. त्यांच्या प्रयत्नांमध्ये आधुनिक पायाभूत सुविधांच्या एकत्रीकरणावर देखरेख करणे, नियोजित समुदाय विकास सुलभ करणे आणि परवडणाऱ्या आणि उच्च - गुणवत्तेच्या घरांच्या वाढत्या मागणीला संबोधित करणे समाविष्ट आहे. या उदयोन्मुख नोड्सचे एक नियोजित शहर म्हणून उरण आणि द्रोणागिरीच्या विकासाला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. क्रेडाई–एमसीएचआयचे अध्यक्ष डॉमनिक रोमेल म्हणाले कि, 'क्रेडाई - एमसीएचआयने नेहमीच द्रोणागिरी आणि उरणच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे, या दोन्ही प्रकरणांना आणि वैयक्तिक उपक्रमांना पाठिंबा दिला आहे. आम्ही हे सुनिश्चित करू की क्रेडाई - एमसीएचआय द्रोणागिरी युनिटला या क्षेत्रांतील वाढ आणि विकासाला चालना देण्यासाठी सर्व आवश्यक सहाय्य प्रदान केले जाईल.'

क्रेडाई - एमसीएचआय द्रोणागिरी युनिटचे अध्यक्ष राकेश प्रजापती म्हणाले, 'दीप राजपाल यांच्याकडून अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारणे मला अत्यंत सन्मानाची गोष्ट आहे, ज्यांनी संस्थापक अध्यक्ष म्हणून अद्भुत कार्य केले आहे. माझ्या कार्यकाळात द्रोणागिरी आणि उरणच्या विकासावर भर देण्याची माझी योजना आहे. सर्व प्रमुख मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी आम्ही नियमित मासिक बैठका घेऊ आणि सर्व सदस्यांना विविध महत्त्वाच्या विषयांवर लाभ देण्यासाठी प्रत्येक तिमाहीत किमान एकदा शैक्षणिक चर्चासत्र आयोजित करू. उद्योगात वापरल्या जाणाऱ्या नवीन तंत्रज्ञानाबद्दल जाणून घेण्यासाठी आम्ही प्रमुख बिल्डर साइट्स आणि कार्यालयांना भेट देऊ. या व्यतिरिक्त, आम्ही सणाचे कार्यक्रम आयोजित करू, क्रेडाई - एमसीएचआय मुख्य सह क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊ आणि या सूक्ष्म बाजारपेठांचे एक्सपोजर वाढवण्यासाठी द्रोणागिरी आणि उरणचा सक्रियपणे प्रचार करू. आमचे युनिट नवी मुंबईतील इतर असोसिएशनद्वारे आयोजित कार्यक्रमांमध्ये देखील सहभागी होईल आणि क्रेडाई - एमसीएचआय मुख्यच्या सर्व क्रियाकलापांमध्ये सहभागी होईल.

आम्ही आमच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सिडको, महाराष्ट्र सरकार, विमानतळ प्राधिकरण आणि सर्व संबंधित प्राधिकरणांकडे आमच्या समस्यांचे प्रतिनिधित्व करत राहू.'

पान १ वरुन

## नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे...

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते सुस्थितीत असावेत यादृष्टीने त्या ठिकाणची सुधारणा कामे जलद करण्यात यावीत तसेच गटारे अथवा नाले सफाई केल्यानंतर तेथील गाळ त्वरित हलवावा असेही स्पष्ट निर्देश देण्यात आले. महापालिका क्षेत्रातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची बारकाईने पाहणी करून तेथील आवश्यक दुरुस्त्या तातडीने करुन घ्याव्यात व त्याठिकाणी नियमित स्वच्छता राहील याची दक्षता घेण्याचे निर्देश देतानाच प्रत्येक विभाग कार्यालयाकडे १० सीट्सचे मोबाईल टॉयलेट असावेत असे नियोजन करण्याचे सूचित करण्यात आले. जिल्हा नियोजन समिती तसेच शासनामार्फत विविध नागरी सुविधा कामांसाठी उपलब्ध होणारा निधी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सुविधा कामांसाठी प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करावेत व प्राप्त होणारा शासकीय निधी पूर्णपणे वापरला जाईल याची विशेष दक्षता घ्यावी असे आयुक्तांनी सूचित केले. अमृत २, पंधरावा वित्त आयोग या शासकीय योजनांतर्गत सुरु असलेली कामे विहीत वेळेत पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले.

नागरी सुविधा कामांची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने अभियंते व कंत्राटदार यांची संयुक्त प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करावी व त्यामध्ये अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करुन दयावे असेही आयुक्तांनी निर्देशित केले. गणेशोत्सव कालावधी जवळ येत असून नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने शाडूच्या मूर्तींचे पूजन करण्याबाबत आवाहन करावे तसेच महानगरपालिका तयार करीत असलेल्या कृत्रिम तलावांचा मूर्ती विसर्जनासाठी वापर करावा याबाबत आत्तापासूनच व्यापक जनजागृती करण्याचे आयुक्तांनी सूचित केले. पावसाळी कालावधी असल्याने शहर स्वच्छतेकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष देण्याचे निर्देशित करीत नागरिकांकडून वर्गीकरण करुनच कचरा दिला जावा याकडे अधिक बारकाईने लक्ष देण्याचे आयुक्तांमार्फत निर्देश देण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड, प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री.शरद पवार तसेच सर्व विभागप्रमुख व विभाग अधिकारी उपस्थित होते.

पान १ वरुन

## बेयेथीशहाबाज गाव इमारत दुर्घटनेत...

घटनास्थळी दाखल झाले व बचाव कार्याला सुरुवात करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनीही तत्परतेने घटनास्थळी येत बचाव कार्याला गती दिली. त्याचप्रमाणे आपत्कालीन व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त शरद पवार, अतिक्रमण विभागाचे उप आयुक्त डॉ. राहुल गेठे तसेच बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल व पोलीसही घटनास्थळी दाखल झाले. यावेळी एन.डी. आर. एफ. च्या टीमलाही पाचारण करण्यात आले. घटना स्थळी पोहोचल्यानंतर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने, एन. डी. आर. एफ. टीम व पोलीसांच्या सहकार्याने बचावकार्य सुरु केले. तेथील रहिवाश्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार इमारतीच्या ढिगाऱ्याखाली ०५ व्यक्ती मलब्याखाली दबले गेले असल्याची शक्यतालक्षात घेत शोध मोहीम सुरू करण्यात आली. शोध कार्यादरम्यान मलब्याखालून लल्लुददीन नाझीर पठाण (पुरुष, २३ वर्ष) आणि रुखसार ललुददीन पठाण (महिला, १९ वर्ष) अशा ०२ व्यक्तींना बाहेर काढण्यात आले व त्यांना महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे तात्काळ दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्या वरील सर्व उपचार महानगरपालिकेमार्फत मोफत करण्यात येत आहेत.

तसेच या शोध कार्यादरम्यान मोहम्मद मिराज (पुरुष, २९ वर्ष, मुळ राहणार - प्रतापगड, उत्तर प्रदेश), शफिक अहमद अन्सारी (पुरुष, ३० वर्ष, मुळ राहणार - भिवंडी, ठाणे) व मिराज अन्सारी (पुरुष, २४ वर्ष मुळ राहणार - जौनपुर, उत्तर प्रदेश) अशा ०३ व्यक्तींचे देह ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले व त्यांना महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे पाठविण्यात आले. त्या ठिकाणी तपासणी अंती सदर तिन्ही व्यक्ती मृत असल्याचे घोषित करण्यात आले आणि शोध व बचाव कार्य मोहीम दुपारी ३.४० वाजता पुर्ण करण्यात आली. त्याचप्रमाणे, मृत व्यक्ती यांचे मृतदेह त्यांच्या मुळ गावी पाठविण्याची व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली असून महापालिकेमार्फत मृत व्यक्तिंच्या कुटूंबाकरीता मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळण्याकरीता मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल असे सांगण्यात आले. सदर इमारतीमध्ये एकूण ३ दुकाने व १७ घरे होती.

इमारतीतून ३९ प्रौढ आणि १६ मुले हे इमारत पडण्याआधीच सुरक्षित बाहेर पडल्याचे निदर्शनास आले. त्या सर्व व्यक्तींना बेलापूर विभागातील आग्रोळी येथील निवारा केंद्रात पाठविण्यात आले व त्यांच्या तात्पुरत्या निवाऱ्याची तसेच अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

जनतेचा सावधान महाराष्ट्र निर्भीड आणि निष्पक्ष

## अतिधोकादायक इमारतीचा पाणीपुरवठा खंडीत

**नवी मुंबई :** वाशी विभागात अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे या प्रवर्गात घोषित करण्यात आलेल्या इमारतीचे पालिका आयुक्तांचे आदेशान्वये वाशी विभाग कार्यालयाचे सहायक आयुक्त सागर मोरे यांच्या नियंत्रणाखाली पाणीपुरवठा खंडित करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

यामध्ये बी - ३ टाईप अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन, सेक्टर २ वाशी या इमारतीचा पाणी पुरवठा २० जून रोजी खंडीत केला होता. तसेच आज विद्युतपुरवठा व मल निरूसारण वाहिनी खंडित करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे मे. नूर को ऑप हौ सो. सेक्टर ९ ए, वाशी तसेच मे. ऊर्जा को ऑप हो सो लि, सेक्टर १० ए या इमारतींचा पाणीपुरवठा खंडित केला आहे.

यापुढेही अतिधोकादायक व राहण्यास अयोग्य असणाऱ्या इमारतीचा पाणीपुरवठा खंडीत केला जाणार असल्याची माहिती वाशी विभागाचे अतिरिक्त आयुक्त सागर मोरे यांनी दिली आहे.

## अमर रुग्णालयातील डॉ. अर्जुन पोळ यांना अटक

**पनवेल :** मावळ येथील तिहेरी हत्याकांडातील संशयित आरोपींची चौकशी अखेर तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी कळंबोली येथील अमर रुग्णालयाचे मालक आणि पीडितेवर उपचार करणारे डॉ. अर्जुन पोळ यांना पोलिसांनी अटक केली आहे. ३० जुलैपर्यंत पोलीस कोठडीत डॉ. पोळ यांना ठेवण्यात आले आहे.

६ ते ९ जुलै या दरम्यान मावळमध्ये राहणाऱ्या पीडितेला गर्भपातासाठी कळंबोली येथील अमर रुग्णालयात आणले होते. पीडितेसोबत तिचा दोन व पाच वर्षांची बालके होती. पीडितेचा मृत्यू अमर रुग्णलयात झाल्यावर तिच्या प्रियकर आणि त्याच्या साथीदाराने तिचा मृतदेह इंद्रायणी नदीत फेकून दिले. बालकांनी त्यांच्या आईला इंद्रायणीत फेकल्याचे पाहून बाल कांनी हंबरडा फोडल्याने प्रियकर व त्याच्या साथीदाराने जिवंत बालकांना इंद्रायणीत फेकून दिले. या घटनेनंतर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केल्यानंतर एकापाठोपाठ एक आरोपींना अटक केली.

मागील तीन दिवसांपासून सुरू होती. अखेर तळेगाव एमआयडीसी पोलिसांना चौकशीअंती डॉ. पोळ यांना अटक केल्याची माहिती या प्रकरणाचा तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक शाम म्हस्के यांनी दिली. डॉ. पोळ यांनी पीडितेचा उपचारानंतर मृत्यू झाल्याची बाब स्थानिक पोलिसांपासून लपवून ठेवली. पीडितेच्या मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यास अनेक बाबी स्पष्ट होऊ नयेत म्हणून बनाव करण्यात आल्याचा आरोप डॉ. पोळ यांच्यावर करण्यात आला होता. डॉ. पोळ यांनी सरकारी वैद्याकीय अधिकारी ते वैद्याकीय अधीक्षक पदापर्यंत सेवेचा अनुभव होता. पनवेल महापालिकेने मनसेच्या आंदोलनानंतर डॉ. पोळ यांच्या अमर रुग्णालयाची नोंदणी रद्द केली आहे. पनवेल पालिकेच्या आरोग्य विभागाने चार महिन्यांपूर्वी एका प्रसूतीदरम्यान मातेचा मृत्यू झाल्याने डॉ. पोळ यांना अमर रुग्णालयात एकही नवीन रुग्ण दाखल करू नये याबाबत नोटीस दिली होती. तरीही डॉ. पोळ यांनी मावळच्या पीडितेवर दाखल करून दिवसभर उपचार केले.

## महिलेची दोन चिमुकल्यांसह गळफास घेऊन आत्महत्या

**वाशिम :** दोन चिमुकल्यासह मातेने गळफास घेऊन राहत्या घरात आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी ९ वाजेदरम्यान उघडकीस आली. जयश्री गवारे असे मृतक महिलेचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, तोंडगाव माहेर असलेल्या जयश्री गजानन गवारे हिचे सासर जांभरूण नावजी ता. वाशिम असून सासरकडील मंडळीच्या त्रासाला कंटाळून जयश्री ही मोठा मुलगा गणेश (४) तर लहान मुलगा मोहित (२) या दोन चिमुकल्यासह गत एका वर्षापासून तोंडगाव येथे वडीलांच्या घरी राहत होती. १७ जुलै रोजी या प्रकरणावर सामोपचारातून तोडगा काढण्याचा प्रयत्न नातेवाईकांच्या उपस्थितीत झाला. मात्र, याला सासरकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. १८ जुलै रोजी सकाळी तोंडगाव येथील राहत्या घरात दोन मुलांसह जयश्री गवारे हीचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेचा पुढील तपास वाशिम पोलीस करीत आहेत.

# मध्य रेल्वे प्रवाशांची उपेक्षा

## उपनगरी रेल्वेगाड्यांची वाहतूक दररोज २५ मिनिटे विलंबाने

**ठाणे :** गेल्या काही दिवस मध्य रेल्वे मार्गावर विविध तांत्रिक कारणांमुळे उपनगरी रेल्वे गाड्यांच्या सेवेवर परिणाम होत आहे. रेल्वे गाड्यांची वाहतूक सुमारे २० ते २५ मिनिटे उशिराने धावत आहेत. त्याचा प्रत्यक्ष परिणाम नोकऱ्यांवर होत असून नोकरदारांना वेळेवर कामाच्या ठिकाणी पोहोचता येत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. वारंवार तक्रारी करूनही रेल्वे प्रशासनाने वेळापत्रक सुधारले नसल्याने प्रवाशांची उपेक्षा कायम आहे.



कसारा, टिटवाळा, आसनगाव, कर्जत भागातून मुंबई, ठाण्याच्या दिशेने प्रवास करणारा कामगारवर्ग मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या भागातून हजारो नोकरदार मुंबईच्या दिशेने ये - जा करत असतात. रस्तेमार्गे मुंबई गाठणे खर्चिक आणि वेळेचा अपव्यय करणारे असल्याने प्रवासी रेल्वे मार्गाला प्राधान्य देतात.

कर्जत - कसारा या दोन्ही रेल्वे मार्गांवर प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या तुलनेत उपनगरी रेल्वेगाड्यांच्या फेऱ्या कमी आहेत. त्यामुळे या मार्गावरील जलद आणि धिम्या रेल्वेगाड्यांमध्ये प्रवाशांना महत्त्वाच्या रेल्वे स्थानकातून रेल्वे गाड्यांमध्ये प्रवेश करणे कठीण जाते.

उपनगरीय रेल्वे मार्गाच्या कसारा मार्गावरून नाशिक तर कर्जत मार्गावरून पुण्याच्या दिशेने एक्स्प्रेस गाड्या आणि मालगाड्यांची वाहतूक होते. मात्र, विविध तांत्रिक कारणांमुळे उपनगरीय रेल्वे गाड्यांची वाहतूक उशिराने होत आहे. एक्स्प्रेस रेल्वे गाड्यांना उपनगरीय रेल्वे गाड्यांच्या आधी सोडणे आहे. या प्रकारामुळे प्रवाशांना दररोज रात्री घरी परतण्यास आणि सकाळी कामाहून घरी पोहोचण्यास उशीर होत असल्याच्या तक्रारी प्रवाशांनी केल्या आहेत.

## कांदाबटाटा बाजार पुनर्विकासाच्या हालचालींना वेग?

**नवी मुंबई :** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा बटाटा बाजाराच्या पुनर्विकासाच्या हालचालींना पुन्हा एकदा वेग आला असून अंतिम निर्णय घेण्यासाठी एपीएमसी प्रशासन व्यापाऱ्यांबरोबर बैठका घेत आहे.

सोमवारी झालेल्या बैठकीमध्ये कांदा बटाटा बाजाराच्या पुनर्विकास प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. या बैठकीदरम्यान पुनर्विकास बाबत व्यापाऱ्यांना किती जागा मिळेल याबाबत माहिती देण्यात आली. या बैठकीत ९० बाजार घटकांची सहमती मिळाली असून आणखीन दोन - तीन बैठकांमध्ये निर्णय लागेल असे मत एपीएमसी प्रशासनाने व्यक्त केले आहे.

सोमवारी आमदार शशिकांत शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व्यापाऱ्याबरोबर बैठक घेण्यात आली आहे. या बैठकीमध्ये व्यापाऱ्यांना कशाप्रकारे त्यांचे गाळे बांधून देण्यात येणार आहेत. किती जागा मिळणार आहे याची माहिती देण्यात आली. तसेच मंगळवारी पुन्हा सल्लागार यांच्याबरोबर व्यापाऱ्यांची बैठक आयोजित केली असून पुनर्बांधणीबाबत चर्चा करण्यात येणार आहे.

सन १९८२ मध्ये कांदा बटाटा मार्केटच्या इमारतीची उभारणी करण्यात आली होती.

या बाजार आवारातील इमारतीची बांधणी ही सिडकोनिर्मित असून २००५ पासून वर्षानुवर्षे धोकादायक यादीत समाविष्ट होत आहे. या बाजार समितीत एकूण २३४ गाळे आहेत. गेला कित्येक वर्षांपासून जीर्ण झालेल्या कांदा बटाटा बाजाराचा पुनर्विकासाला खोडा बसला आहे.

### मागील वर्षापासून भिजत घोंगडे

मागील वर्षी देखील पुनर्विकासाची जोरदार चर्चा सुरू होती तसेच अंतिम निर्णय घेतला जाईल यावरही ठाम मत व्यक्त करण्यात येत होते. मात्र पुन्हा एकदा पुनर्बांधणीचा विषय रेंगाळला. यावर्षी बाजारातील मोडकळीस आलेल्या इमारतींचा छताचा भाग कोसळल्याने पुन्हा एकदा पुनर्बांधणीच्या विषय उपस्थित होत आहे त्याच अनुषंगाने पुनर्बांधणीच्या विकासाला वेग देण्यात येत आहे.

### प्रशासनाच्या व्यापाऱ्याबरोबरच्या बैठकीत ९० टक्के सहमती

कांदा बटाटा बाजार समितीच्या पुनर्बांधणीबाबत व्यापाऱ्याबरोबर सोमवारी बैठक झाली. या बैठकीत ९० टक्के व्यापाऱ्यांची सहमती असून आणखी दोन–तीन बैठका घेण्यात येणार आहेत. या कांदा बटाटा बाजाराच्या पुनर्बांधणीचा विषय मार्गी लागेल असे नियोजन आहे.

**– डॉ. पी एल खंडागळे, सचिव, एपीएमसी**

## रुग्णालय बिलाच्या तगाद्याला कंटाळून आत्महत्या

**नवी मुंबई :** नवी मुंबईत डॉक्टरांच्या प्रतिमेला काळिमा फसवणारी घटना समोर आली आहे. एका दाम्पत्याला १४ वर्षांनी अपत्य झाले ते हि जुळे झाले मात्र त्यांची तब्येत नाजूक असल्याने त्यांना अति दक्षता विभागात ठेवण्यात आले होते. मात्र ९० हजार भरूनही वारंवार बिल द्या असा तगादा रुग्णालयाने लावला होता. तसेच उद्या जर बिल जमा केले नाही तर उपचार थांबवण्यात येईल असा इशारा दिल्याने त्या निष्पाप जुळ्यांच्या वडिलांनी त्राग्याने थेट आत्महत्येचे पाऊल उचलले. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी एक चिठ्ठी लिहली असून त्यात आत्महत्येचे कारण डॉक्टरांनी लावलेला बिलाचा तगादा असल्याचे नमूद करण्यात आले आहे . या प्रकरणी नेरुळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याचे काम सुरु आहे अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

नेरुळ येथील मनपा वाचनालयात सुरक्षा रक्षकाचे काम नरेंद्र गाढे हे करत असून ते शिरवणे येथे राहतात. त्यांना विवाह झाल्या नंतर तब्बल चौदा वर्षांनी अपत्य झाले. जुळ्या मुलांना त्यांची पत्नी वंदना यांनी फर्टीलिटी आणि रिसर्च सेंटर रुग्णालय नेरुळ येथे जन्म दिला. चार दिवसापूर्वीच त्यांना पोटात वेदना होत असल्याने रुग्णालयात दाखल केले होते. गुरुवारी त्यांना जुळी मुले झाली. त्यांची तब्येत नाजूक असल्याने अति दक्षता विभागात ठेवण्यात आले होते. मात्र या बिलापोटी गाडे यांनी अगोदर ४५ हजार नंतर ९० हजार अशी बिले भरली होती. मात्र तरीही बिल वाढत चालल्याने त्यांनी आपल्या पत्नीचा डिस्चार्ज घेतला. दोन जुळी मुले अद्याप अति दक्षता विभागात उपचारार्थ ठेवण्यात आले होते. मात्र १ लाख ३५ हजार बिल भरल्यानंतर देखील त्यांना आणखी दीड लाख रुपये भरण्यासाठी डॉक्टरांकडून वारंवार फोन करून त्रास दिला जात होता. बिल भरले नाही तर तुमच्या मुलांचा व्हेंटिलेटर काढण्यात येईल अशी धमकी या डॉक्टरांकडून देण्यात येत होती.

## पनवेलमध्ये २५ ठिकाणी डासांची पैदास केंद्रे

**पनवेल :** पनवेल महापालिका क्षेत्रात जून महिन्यात डेंग्यूचे १५ आणि मलेरियाचे ३९ रुग्ण आढळले. महापालिकेच्या आरोग्य विभागाने पावसाळ्यात डासांची पैदास होणाऱ्या ठिकाणांचा शोध घेण्यासाठी पथक नेमल्यावर पालिकेतील १० गृहनिर्माण सोसायट्या आणि १५ इमारत बांधकामाच्या ठिकाणी साचलेल्या पावसाच्या पाण्यामध्ये डेंग्यूच्या अळ्या तयार झाल्याचे दिसले. पालिकेच्या आरोग्य विभागाने डासांच्या अळ्या सापडलेल्या १५ बांधकाम ठिकाणच्या विकासकांना कारणे दाखवा नोटीस बजावली.

तसेच पालिकेने नोटीस बजावल्यानंतरसुद्धा बांधकाम ठिकाणी पुन्हा डासांच्या अळ्या सापडल्यास ही बांधकाम क्षेत्रे बंद करण्यात येतील असा इशारा पनवेल पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी दिला. विकासकांसोबत १० गृहनिर्माण सोसायट्यांना पालिकेने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. नागरिकांनी गृहनिर्माण सोसायट्या, घरांच्या परिसरात पाणी साचणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना पालिकेने केली आहे.

जानेवारी ते जून महिन्यामध्ये पनवेल पालिका क्षेत्रात डेंग्यूचे ५५ रुग्ण आणि मलेरियाचे



१३९ रुग्णांची नोंद पालिकेच्या आरोग्य विभागाकडे झाली आहे. पावसाळ्यात वाढणाऱ्या डासांवर नियंत्रणासाठी पालिकेच्या आरोग्य विभाग व कीटकनाशक विभागाने मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत शहरातील पाणी साचलेल्या ठिकाणांचे सर्वेक्षण केले जाते. यामध्ये डास पैदास ठिकाणे शोधली जातात.

नव्याने बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पावसाचे व दूषित पाणी साचणार नाही. त्यामध्ये डासांच्या अळ्या तयार होणार नाहीत, याची काळजी नागरिक व विकासकांनी घ्यावी असे आवाहन महापालिकेने केले आहे. अन्यथा पालिका संबंधितांवर दंडात्मक कारवाई करेल असा इशारा पालिकेचे घनकचरा व आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिला आहे.

## उरण पोलीस ठाण्यावर संतप्त नागरिकांचा मोर्चा

**उरण :** शहरातील तरुणीच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ रविवारी उरणच्या संतप्त नागरिकांनी पोलीस ठाण्यावर प्रचंड मोर्चा काढला होता. या मोर्चात गुन्हेगाराला त्वरित अटक करून त्याला फाशीची शिक्षा देऊन तरुणीला न्याय देण्याची मागणी करण्यात आली.

सकाळी शहरातील गांधी पुतळा ते पोलीस ठाणे असा मोर्चा काढण्यात आला. या वेळी मोर्चेकऱ्यांनी शहरातील बाजारपेठ बंद केली. तर उलवे नोडमध्येही घटनेच्या निषेधार्थ बंद पाळण्यात आला. या वेळी मोर्चात पोलिसांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. संतप्त नागरिकांनी तब्बल तीन तास पोलीस ठाण्याचे प्रवेशद्वार रोखून धरले होते. या मोर्चात उरणमधील तरुण, तरुणी व महिला मोठ्या संख्येने सहभागी होत्या. त्याचप्रमाणे उरणमधील सर्व पक्षांचे नेते व पदाधिकारीही उपस्थित होते.

सकाळी १० वाजता सुरू झालेला हा मोर्चा दुपारी अडीच वाजेपर्यंत सुरू होता. या काळात नागरिकांनी उरणमधील बाजारपेठ बंद केली. जोपर्यंत आरोपी ताब्यात घेतला जात नाही. तोपर्यंत बाजार बंद करण्याची मागणी केली. नागरिकांना शांत करण्यासाठी नवी मुंबई पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी पोलीस पथके रवाना झाली असून दोन दिवस द्या असे आवाहन केले. मात्र आरोपीला प्रथम अटक करा त्याशिवाय जाणार नाही, अशी भूमिका घेतली.

# पोस्टरबाजी करण्यात सरकार पटाईत

### विधान परिषदेतीविरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची टीका, पीडितांच्या कुटुंबीयांचे सांत्वन



**नवी मुंबई :** पत्रकारांशी संवाद साधताना सरकार जागरूक नसल्याचे म्हणत राज्य शासन फक्त पोस्टरबाजी करण्यात पटाईत आहे. त्यामुळे महिलांची सुरक्षा वाऱ्यावर आहे, अशा शब्दांत टीका करत विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यातील महिला सुरक्षित आहेत का, हा प्रश्न आता सरकारला विचारण्याची वेळ आली आहे, असे पत्रकारांशी बोलताना सांगितले. नवी मुंबई आणि उरणमध्ये दोन वेगवेगळ्या घटनांत दोन महिलांची हत्या झाली होती. याप्रकरणी त्यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तांची भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी घटनेबाबत सरकार गंभीर नसल्याची खंत व्यक्त केली. राज्यातील महिला सुरक्षित नाहीत. मुख्यमंत्री केवळ लाडकी बहीण योजना जाहीर करतात, त्याच्या जाहिरातीवर प्रचंड पैसा खर्च केला जात आहे. मात्र प्रत्यक्षात या लाडक्या बहिणी सुरक्षित नाहीत. राज्यातील सरकार मजबूत नाही, त्यामुळे कायदा मजबूत नाही. परिणामी महिलांवरील अत्याचाराचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत, अशी टीका अंबादास दानवे यांनी केली.

नवी मुंबईतील एक विविहित महिला कौटुंबिक त्रासाला कंटाळून शिळ फाटा येथील मंदिरात गेली होती. तेथे तिच्यावर सामूहिक बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केली होती. तसेच उरण येथील तरुणीची तिच्या प्रियकराने अत्यंत निर्घृणपणे हत्या करून मृतदेहाचे तुकडे केले.

### सोमय्या यांच्याकडूनही तरुणीच्या कुटुंबीयांचे सांत्वन

भाजपचे किरीट सोमय्या यांनीही भेट दिली. यावेळी त्यांनी सरकार आणि पोलीस आरोपीला लवकरच अटक करील असा विश्वास व्यक्त केला. या प्रकरणात जाती–जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी सोमय्या यांनी केली. तर पोलिसांना दोन दिवस दिले आहेत. या काळात आरोपी न पकडल्यास बेमुदत उरण बंद करण्याचा इशारा उरणचे आ. महेश बालदी यांनी दिला.

### न्हावा ग्रामस्थांचा मोर्चा

न्हावामध्ये एकतर्फी प्रेमातून एका तरुणीवर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यातील आरोपीला कडक शिक्षा करा या मागणीसाठी सोमवारी न्हावा शेवा पोलीस ठाण्यावर ग्रामस्थांनी मोर्चा काढला होता. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. महिलांवरील अत्याचारांच्या घटनेत वाढ होत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. यावेळी किशोरी पेडणेकर, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी आमदार मनोहर भोईर, कॉ. भूषण पाटील, कांतीलाल कडू आदी उपस्थित होते. यावेळी बंदर विभागाचे सहपोलीस आयुक्त डॉ. विशाल नेहूल यांच्याशी चर्चा करण्यात आली.

## खारघरमध्ये सराफाच्या दुकानात शिरुन लूट



**पनवेल :** खारघर वसाहतीमधील सेक्टर ३५ ई मधील बी. एम. ज्वेलर्स या सराफाच्या दुकानात रविवारी रात्री १० वाजता तीन चोरांनी रिव्हॉल्व्हर घेऊन सोन्याचे चांदीचे लाखो रुपयांचे दागिने लुटून नेले. ही सर्व घटना सराफाच्या दुकानातील सीसीटिव्हीमध्ये कैद झाली आहे. सराफ दुकानदाराने सायरन वाजवून मदत मागण्याचा प्रयत्न केला तरी कोणतीही मदत मिळाली नाही. परंतू सायरनच्या धाकेमुळे अवघ्या दोन मिनिटांत चोरट्यांनी हाताल लागेल तेवढे दागीने घेऊन चोरांचे त्रिकुट दुचाकीवर बसून पसार झाले.

खारघरमधील बी. एम. ज्वेलर्समध्ये हेल्मेट व रेनकोट घालून चोरटे सराफाच्या दूकानात दहा वाजता शिरले. हातामध्ये रिव्हॉल्व्हर डोक्यात हेल्मेट असल्याने सराफ दुकानातील तिघेही दुकानदार घाबरले. ज्या चोराच्या हातामध्ये रिव्हॉल्व्हर होती त्याने दुकानात शिरल्यावर पहिल्यांदा दुकानात हवेत गोळीबार केला. या दरम्यान एका दुकानदाराने सायरन वाजविण्याचा प्रयत्न केला. या सायरनच्या आवाजामुळे दूकानाबाहेरील रहिवाशांचे लक्ष दुकानाकडे वेधले. अनेक रहिवाशांनी स्वत:जवळील मोबाईल फोनमध्ये सराफ दुकानात सुरू असणारा थरार कैद केला. तर अनेकांनी चोर चोर असा आरडाओरडा करुन रहिवाशांनी मदतीसाठी बोलावले. पोलीस नियंत्रण कक्षाकडे मदतीसाठी फोन करण्यात आला.

या दरम्यान दुकानातील इतर दोन चोरट्यांनी दुकानातील काचेमध्ये ठेवलेले दागिने काढण्यासाठी दुकानातील काचा फोडण्याची सुरुवात केली. अवघ्या दोन मिनिटांत हा सर्व लुटीचा थरार झाला. हाताला जेवढा लुटीचा माल मिळेल तेवढा घेऊन चोरटे दुचाकीवर बसून पसार झाले. चोरट्यांनी दुकानाबाहेर कोणी पकडू नये म्हणून त्यांच्या हातामधील रिव्हॉल्व्हरने हवेत गोळीबार केला. नवी मुंबईत मागील काही दिवसात महिलांवरील अत्याचार व खून, सराफाची लुटमार, गावात रात्रीची फिरणारी चोरांची टोळी यामुळे पोलीसांसमोर चोरट्यांनी आव्हान उभे ठाकले आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी पोलीस दलात आधुनिकता आणली मात्र रस्त्यांवर होणारे गुन्हे तातडीने थांबविणे हे पोलीस आयुक्तांसमोर मोठे आव्हान आहे.

## वसई न्यायालयात ५५ हजार खटले प्रलंबित

## केवळ १० न्यायाधीश, नव्या इमारतीची जागा हस्तांतरणही रखडले

**वसई :** वसईच्या सत्र न्यायालयात अवघे १० न्यायाधीश असून त्यामुळे तब्बल ५५ हजारांहून अधिक खटले प्रलंबित आहेत. दुसरीकडे सार्वजनिक बांधकाम खात्याकडून मंजूर ५८ गुंठे जागा अद्याप हस्तांतरित न झाल्याने न्यायालयाच्या नव्या इमारतीचे काम रखडले आहे. वसईत १९५४ साली न्यायालयाची स्थापना झाली. त्यानंतर २००७ साली सत्र न्यायालय सुरू झाले. सध्या वसईत दिवाणी स्तर कनिष्ठ, दिवाणी स्तर वरिष्ठ, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी तसेच जिल्हा व सत्र न्यायालय आहे. ही चार न्यायालये केवळ २० गुंठे एवढ्या कमी जागेत दाटीवाटीने उभी आहेत. विधी आयोगाच्या १२० व्या अहवालानुसार २००० सालापर्यंत १० लाख लोकसंख्येसाठी १०७ न्यायाधीश नियुक्त करावेत अशी शिफारस करण्यात आली होती. मात्र वसई न्यायालयात अवघे १० न्यायाधीश आहेत. त्यांच्याकडे प्रतिदिन २०० ते ४०० खटले येतात. ५५ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. यातील अनेक खटले हे २० ते २५ वर्षे जुने आहे. यामुळे पक्षकारांच्या कुटुंबीयांसहित १० लाखांची लोकसंख्या बाधित झाली आहे.

वाढती लोकसंख्या, प्रलंबित खटले तसेच न्यायाधीशांची संख्या वाढवणे, नवीन दिवाणी व फौजदरी, सहकार, कुटुंब न्यायालयाची स्थापना करणे, पक्षकार, साक्षीदार यांना बसण्यासाठी जागा यासाठी नवीन न्यायालयाच्या इमारतीची गरज आहे. मात्र जागा हस्तांतरणही रखडले आहे.

### जागेसाठी १३ ऑगस्टपासून आंदोलन

नायगावमधील उमेळा आणि वसईतील सनसिटी येथील जागेचा प्रस्ताव बारगळल्यानंतर वसई गावातील प्रांत अधिकारी कार्यालयासमोरील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या जागेचा पर्याय होता. १२ जून २०२३ रोजी पालक न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत येथील ५८ गुंठे जागा वसई न्यायालयासाठी देण्यास तत्त्वतरू मान्यता दिली होती. या जागेवर किमान १७ मजली इमारत उभी राहू शकते. मात्र अद्यापि ही जागा न्यायालयाकडे वर्ग केलेलीनाही. लवकर मंजुरी नाही मिळाली तर विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे काम रखडण्याची शक्यता आहे. त्यामुळे १३ ऑगस्टपासून वकील संघटनांतर्फे आंदोलन केले जाणार आहे.

जनतेचा सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

## अत्याचारानंतर अल्पवयीन मुलीची आत्महत्या

**वसई :** उत्तर प्रदेशातून पळवून आणलेल्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलीने लैंगिक अत्याचारानंतर आत्महत्या केल्याची घटना काशिमीरा येथे घडली आहे. या प्रकरणी काशिमीरा पोलिसांनी दोन तरुणांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त करणे तसेच पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

पीडित तरुणी १७ वर्षांची असून उत्तर प्रदेशातील आझमगढ जिल्ह्यातील फुलपूर तालुक्यात राहणारी आहे. गालिब शेख (२०) या तरुणाने तिला फूस लावून काशिमीरा येथे आणले. पेणकर पाडा येथील एका खोलीत ठेवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. यामुळे तिने गळफास घेऊन आत्महत्या केली. तिचा शोध घेत तिचे कुटुंबीय मिरा रोड येथे आल्यावर हा प्रकार रविवारी उघड झाला. या प्रकरणी काशिमीरा पोलिसांनी गालिब शेख आणि त्याचा साथादीर मोहम्मद तालीब शेख (२२) यांच्याविरोधात अन्य कलमांसह पोक्सोच्या कलम ४ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# महापालिका कार्यक्षेत्रातील १० सोसायट्या व १५ बांधकाम विकासकांना महापालिकेच्या नोटीसा



**पनवेल, दि. २७ :** पनवेल महापालिका क्षेत्रातील सोसायट्या व इमारत बांधकाम परिसरात साठलेल्या पावसाचे पाण्यामध्ये डेंग्यूच्या अळ्या तयार झाल्याचे आढळून आले आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून अशा १५ बांधकाम विकासकांना कारणे दाखवा नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. ज्या बांधकाम क्षेत्रांना आत्ता नोटीसा दिल्या आहेत, त्याठिकाणी पुन्हा डासाच्या अळ्या सापडल्यास ही बांधकाम क्षेत्रे बंद करण्यात येणार असल्याच्या सूचना आयुक्त श्री. मंगेश चितळे यांनी दिल्या आहेत. बांधकाम विकासकांबरोबर १० सोसायट्यांना देखील महापालिकेच्यावतीने कारणे दाखवा नोटीसा देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी आपल्या सोसायट्या, घरांच्या परिसरात पाणी साचणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना पालिकेच्यावतीने देण्यात आल्या आहेत.

पावसाळा सुरू झाल्यानंतर मलेरिया, डेंग्यू, लेप्टो यांसारखे आजार मोठ्या प्रमाणात पसरतात. त्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभाग व किटकनाशक विभागाने मोहिम हाती घेतली आहे. या अंतर्गत मलेरिया, डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शहरातील पाणी साचलेल्या ठिकाणाचे सर्वेक्षण केले असता डास उत्पत्ती स्थाने सापडलेल्या १५ बांधकाम विकासकांना व १० सोसायट्यांना महापालिकेच्यावतीने नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे नव्याने बांधकाम सुरू असलेल्या सर्व विकासकांना पावसाचे पाणी, दूषित पाणी साचणार नाही. त्यात डासांच्या आळ्या तयार होणार नाहीत, याची काळजी घ्यावी असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

घनकचरा व आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सूचनेनूसार किटकनाशक विभागाने कृती आराखडा तयार केला आहे. या कृती आराखड्यानूसार सूचना नोटिसा दिलेल्या बांधकाम स्थळे, भंगार दुकानदार, नारळविक्रेते, नर्सरी व्यवसायिक, सोसायट्यांनी महापालिकेने सांगितलेल्या सूचनांचे पालन केले नाही, संबधित ठिकाणी डेंगू, मलेरियाचे डास, त्यांची अंडी आढळल्यास त्यांच्यावरती महापालिकेच्या माध्यमातून दंडात्मक कारवाई होईल असे सक्त निर्देश आयुक्तांनी दिलेले आहेत.

पाऊस कमी झाल्यावर साठलेल्या पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात मलेरिया, डेंग्यू डासांची पैदास होत असते. त्यामुळे याविषयी किटकनाशक विभागाच्यावतीने जनजागृतीपर हॅण्डबीले पत्रके वाटण्यात येत आहे. तसेच ऑगस्टपासून महिन्यापासून दवंडी व मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे.



## विजय नाहटा यांच्या वीर जवान फाउंडेशनच्या वतीने शहीद जवानांच्या परिवारास आर्थिक मदत

**वाशी (जनतेचा सावधान महाराष्ट्र)** : दि. २६ जुलै २०२४ रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात संस्थापक विजय नाहटा यांच्या वीर जवान फाउंडेशनच्या वतीने 'वीर जवान पुरस्कार २०२४' हा वीर जवान फाउंडेशनचे अध्यक्ष सुरेश काकडे यांच्या संकल्पनेतून शहीद जवानांच्या परिवारास आर्थिक मदत करण्यात आली. सीमेवर देशाचे संरक्षण करताना वीरगती प्राप्त झालेल्या जवानांच्या वीर पत्नी वीर माता व त्यांच्या कुटुंबियांना मानसिक व आर्थिक मदत करून त्यांचे जीवन सुखमय करायचा निस्वार्थी प्रयत्न गेली ६ वर्षे माजी सनदी अधिकारी विजय नाहटा हे वीर जवान फॉउंडेशनच्या माध्यमातून करीत आहेत.

यंदाही महाराष्ट्रातील शहीद जवानांच्या कुटुंबियांचा हृदय सन्मान माजी सनदी अधिकारी विजय नाहटा यांच्या पुढाकाराने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात हजारो नागरिकांच्या साक्षीने मोठ्या भावुक वातावरणात करण्यात आला.

खऱ्या अर्थाने शहीदांच्या कुटुंबाला मदत करुन त्यांचा हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने सन्मान करुन वीर जवान फॉउंडेशनने कारगिल दिवस साजरा केला. भारताचे राष्ट्रपती मेडल देऊन वीर जवानांचा सन्मान करतात, पण सार्वजनिक नागरी सत्काराचे महत्व काही औरच असते.

विजय नाहटा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विजय नाहटा यांनी २०१८ पासून हा कौतुकास्पद सन्मान सोहळा आजही अविरतपणे सुरुच ठेवला आहे. यावेळी महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या २५ वीर पत्नी वीर माता आणि त्यांच्या कुटुंबियांना ३१ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, शॉल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

# नवी मुंबईत नेरूळ, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली विभागात

# अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई

**नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अनधिकृत बांधकाम विरोधात मोहीम तीव्र करण्यात आलेली असून नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार, अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली नेरूळ, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली विभागांत ६ बांधकांमावर तोडक कारवाई करण्यात आली.**



महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये नोटीस देऊनही संबंधितांनी नोटीशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत कारवाई करण्यात आली. यामध्ये नेरूळ विभागात राजेंद्र रामा भगत व अनिल रामा भगत यांचे घर क्र. २०७/२०८ लोट्स अपा. नेरूळ येथील बांधकाम हटविण्यात आलेले आहे.

तसेच कोपरखैरणे विभागात सेक्टर ४ कोपरखैरणे येथे रूम नं. ९९४ येथील पी.जी.सालेकर यांचे अनधिकृत वाढीव बांधकाम तसेच रूम नं. ९९३ येथे कमल देव रंगनाथ यादव यांचे अनधिकृत वाढीव बांधकाम निष्कासित करण्यात आले.

घणसोली विभागातील गणेश सहदेव सुके यांचे बांधकाम तसेच विजय बहादूर सिंग यांच्या अनधिकृत बांधकामवर कारवाईचा हातोडा पडला.

ऐरोली विभागातही सेक्टर २ येथे संतोष कांबळे यांनी केलेले वाढीव बांधकाम तोडून टाकण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार, उपआयुक्त डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली नेरूळ विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अमोल पालवे व अभियंता राजू हळंदे तसेच कोपरखैरणे विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. सुनिल काठोळे व अभियंता श्री. सचिन नामवाड, घणसोली विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. संजय तायडे व अभियंता श्री. रोहित ठाकरे, ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. अशोक अहिरे व कनिष्ठ अभियंता श्री. राज नागरगोजे यांच्या उपस्थितीत या तोडक कारवाया करण्यात आल्या. या मोहीमेसाठी पोलीस बंदोबस्तात आवश्यक मजूर, पोकलन, गॅस कटर, ब्रेकर, जेसीबी इत्यादींचा वापर करण्यात आला.

अशाप्रकारे काल रविवारी एकाच दिवसात विविध विभागांमध्ये केलेल्या ८ अनधिकृत बांधकामांवरील धडक कारवाईनंतर आजही ६ अनधिकृत बांधकामांवर तोडक कारवाई करण्यात आलेली असून यापुढील काळात कारवाया तीव्रतेने राबविण्यात येणार आहेत.

## नेरुळ पोलीस स्टेशन येथे नियुक्ती होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी यांचा गुन्हेगारांना सतर्कतेचा इशारा



नेरुळ पोलीस स्टेशन येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी यांची नियुक्ती झाल्यानंतर जनतेचा सावधान महाराष्ट्र वृत्तपत्राचे संपादक राजेंद्र बोडके यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या व नेरुळ विभागातील समस्या बद्दल विचारले असता त्यांनी माहिती देताना सांगितले की नेरुळ विभागामधील अनाधिकृत पणे चाललेले व्यवसाय चोरी घरफोडी व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या सर्वच गुन्हेगारांवर अंकुश ठेवून गुन्हेगारीला आळा घालण्याचा काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले पोलीस हे नागरिकांचे मित्रच असतात नागरिकांनीही जागृत राहून पोलिसांना सहकार्य करण्याची गरज आहे आजूबाजूच्या विभागांमध्ये काही चुकीचा गुन्हा घडत असेल तर नागरिकांची ही नैतिक जबाबदारी आहे पोलिसांना कळविने, पोलीस हे नागरिकांच्या सेवेसाठी नेहमीच तत्पर असतात वाशी विभागात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मी आणि माझी संपूर्ण टीम तत्पर असणार आहे वाशी विभागातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या अनेक गुन्हेगारांना चाप बसणार अशी चर्चा नेरुळ विभागात चालली आहे.

## दाऊद शेखला अटक झाल्यानंतर यशश्रीच्या आईची थेट मागणी; म्हणाली, "टॉर्चर करून त्याला..."

उरणमध्ये यशश्री शिंदे या २२ वर्षीय तरुणीची २५ जुलै रोजी निर्घृण हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी २७ जुलै रोजी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल झाला होता. तर, आता आरोपी दाऊद शेख याला आज कर्नाटकातून अटक करण्यात आली आहे. अटक केल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याची अधिक चौकशी सुरू आहे.दरम्यान, यावरून यशश्रीच्या आईने अंत्यत संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. "माझ्या मुलीला जेवढा त्रास झाला तेवढंच त्यालाही टॉर्चर करून फाशी दिली पाहिजे. हे प्रकरण फॅस्ट ट्रॅकवर चालवलं पाहिजे. माझ्या मुलीप्रमाणे ज्या मुली तडफडून गेल्या आहेत, त्यांनाही न्याय द्या. म्हणजे माझ्या लेकीलाही समाधान मिळेल. पण माझ्या मुलीला त्याने जेवढा त्रास दिला तेवढाच त्रास त्याला द्या आणि फाशी द्या. सध्या प्रकरण चर्चेत आहे म्हणून शिक्षेचं आश्वासन दिलं जाईल. पण त्याला फाशी दिलीच पाहिजे", असं यशश्रीच्या आईने सांगितलं. "प्रशासनाने या प्रकरणात कडक कायदा तयार केला पाहिजे. निर्भया प्रकरण झाल्यानंतर सरकारला जाग आणि कायदे तयार केले गेले. पण असे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे कायद्यात कठोर तरतूद केल्या पाहिजे", अशी मागणी यशश्रीच्या वडिलांनी केली आहे.

### पोलिसांना सांगितला हत्येचा घटनाक्रम

२५ जुलैला यशश्री शिंदे बेपत्ता झाल्याची तक्रार उरण पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली. त्यानंतर २६ जुलैच्या रात्री या मुलीचा मृतदेह आम्हाला सापडला. त्यानंतर शनिवार सकाळी म्हणजेच २७ जुलैला हत्येचा गुन्हा आम्ही दाखल केला. या प्रकरणात आम्ही दोन ते तीन संशयित शोधले होते. त्यांच्या शोधासाठी आम्ही नवी मुंबई आणि कर्नाटक या ठिकाणी शोध पथक पाठवलं. ज्या गोष्टी आम्हाला कळत होत्या त्या कर्नाटकमध्ये आम्ही पथकाला देत होतो. त्यानंतर दाऊद शेखला अटक करण्यात आली. दाऊदचं नेमकं लोकेशन काय? ते आम्हाला सापडत नव्हतं. आम्हाला हे समजलं होतं की दाऊद शेख कर्नाटकचा आहे. त्यानंतर त्याचे नातेवाईक, त्याचा मित्र या सगळ्यांची माहिती आम्हाला कामाला आली. यातला मोहसिन नावाचा संशयित हा मुलीच्या संपर्कात होता. मात्र त्याने हत्या केलेली नाही. दाऊद आणि यशश्री या दोघांचा काहीही संपर्क नव्हता. त्याची चौकशी आम्ही करतो आहोत. कारण त्याने गुन्हा मान्य केला आहे असं पोलिसांनी सांगितलं.






जनतेचा सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष
जाहिरातीचे दर

| पान नं. १ | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. २०,०००/- |
| अर्धे पान | रु. १०,०००/- |
| पाव पान | रु. ६,२००/- |
| हार्दिक शुभेच्छा | रु. २,०००/- |
| जाहिर नोटिस | रु. ७००/- |
| श्रद्धांजली | रु. ५००/- |
| **पान नं. ४** | |
| पूर्ण पान | रु. १५,०००/- |
| अर्धे पान | रु. १०,०००/- |
| पाव पान | रु. ४,०००/- |
| हार्दिक शुभेच्छा | रु. १०००/- |
| जाहिर नोटिस | रु. ७००/- |
| श्रद्धांजली | रु. ५००/- |
| **पान नं. २ व ३** | |
| पूर्ण पान | रु. १०,०००/- |
| अर्धे पान | रु. ६,०००/- |
| पाव पान | रु. ३,०००/- |
| हार्दिक शुभेच्छा | रु. १०००/- |
| जाहिर नोटिस | रु. ७००/- |
| श्रद्धांजली | रु. ५००/- |

संपर्क
९३२२५९२८१४

जनतेचा सावधान महाराष्ट्र
निर्भीड आणि निष्पक्ष

संपादक

सह संपादक : अरुण बिराजदार ९१ ९३२१८ ४७१३६
उपसंपादक : कुंडलिक कानगुडे ९१७-२१२-३०१३
कायदेशीर सल्लागार : ॲड.रचना एस. भालके. (B.Com,LL.B. M.Phil)
वकील उच्च न्यायालय

जनतेचा सावधान महाराष्ट्र हे साप्ताहीक मालक, मुद्रक, प्रकाशक राजेंद्र कारभारी बोडके यांनी प्रचिता प्रिंट प्रा. लि. गाळा नं. १३, मकबा बिल्डींग, एन. एम. जोशी मार्ग, भायखळा (प.) मुंबई ४०० ०२७ येथे छापून रुम नं. ०१, हाऊस नं. १०५२, एन के अपार्टमेंट, ए विंग, सेक्टर - ५, कोपर खैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९ (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांशी, लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही) सर्व वाद ठाणे /नवी मुंबई कोर्टात होतील मो. (९३२२५९२८१४) मुख्य संपादक : राजेंद्र कारभारी बोडके ई मेल : savadhanmaharashtra@gmail.com